# जाहीरात

## यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
## (सामान्य प्रशासन विभाग)
## जि.प.यवतमाळ करीता वकील पॅनल नियुक्तीबाबत
## एकुण पद संख्या-१५

**१.सर्वोच्च न्यायालय दिल्ली- ०१**
**२. उच्च न्यायालय नागपूर - ०४**
**३.उच्च न्यायालय औरंगाबाद- ०१**
**४.जिल्हा न्यायालय- ०४ (यवतमाळ मुख्यालय, कळंब,बाभुळगांव,नेर)**
**५.पंचायत समिती स्तरावरील- ०४ (पुसद,उमरखेड,महागांव-०१)(दारव्हा,दिग्रस आर्णी-०१)(झरी,पांढरकवडा घाटंजी-०१) (वणी, मारेगांव,राळेगांव-०१)**
**६.आयुक्त कार्यालय- -०१**

------------------------------

**एकुण -१५**

कामगार न्यायालय, औद्योगीक न्यायालय, जिल्हा न्यायालय, मोटार अपघात प्राधीकरण, यवतमाळ जिल्हयांतर्गत तालुकास्तरावरील न्यायालये तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारण नागपुर तसेच उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर, औरंगाबाद, सर्वोच्च न्यायालय दिल्ली या व इतर न्यायालयीन प्रकरणाकरीता जिल्हा परिषद यवतमाळ करीता वकील पॅनल गठीत करणे.

१. पात्रता अ) एल.एल.बी. किंवा त्यापेक्षा जास्त, ब) बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा किंवा बार कौन्सील ऑफ इंडिया येथील नोंदणी.
२. अनुभव - त्या त्या न्यायालयात वकील व्यवसाय केल्याचा ७ वर्षाचा अनुभव
३. अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे - शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र, बार असोसिएशचा परवाना तसेच अनुभव प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्राच्या स्व सांक्षकिंत प्रती.
४. यापुर्वी जिल्हा परिषदच्या वकील पॅनलवर असल्यास त्यांच्या कामाचे मुंल्यमापन करुन समिती निर्णय घेईल
५. अर्ज सादर करावायाचा अंतिम दिनांक ३ जुलै, २०२४ (मुलाखतीच्या वेळेस मुळ प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे)
६. मुलाखतीचा दिनांक २३ जुलै,२०२४
७. वकील पॅनल मध्ये मुलाखत घेवुन नियुक्ती करण्यात येईल
८. अर्ज सादर करावयाचे ठिकाण - उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद प्रशासकीय ईमारत पहिला माळा, आर्णी रोड, जिल्हा परिषद यवतमाळ ४४५००१
**९. टिप - जिल्हा स्तरावरील व तालुकास्तरावरील तसेच उच्च न्यायालय नागपुर औरंगाबाद तसेच सर्वोच्च न्यायालयाकरीता स्वतंत्रपणे अर्ज करणे बंधनकारक राहील**
वकील पॅनल नियुक्ती अर्जाचा नमुना, अटी व शर्ती www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

क्र.यजिप/साप्रवि/आस्था-२/कावि१५३५/२०२४
जिल्हा परिषद, यवतमाळ,
(सामान्य प्रशासन विभाग)
दिनांक २५/६/२०२४

**(मंदार पत्की,भा.प्र.से)**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

# यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ

(सामान्य प्रशासन विभाग)

यवतमाळ जिल्हा परिषदेची न्यायप्रविष्ट प्रकरणे चालविण्याकरीता वकील पॅनलसाठी

**अटी व शर्ती**

जिल्हा परिषद यवतमाळचे वतीने दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे कामगार / औद्योगिक / जिल्हा व सत्र न्यायालय / अप्पर आयुक्तांकडील अपील प्रकरणे तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय तसेच इतर वरिष्ठ मुख्यालयीन न्यायपिठांमध्ये जिल्हा परिषद यवतमाळने वकील पॅनलवर नियुक्त करण्यासाठी / नियुक्त केलेल्या वकीलांसाठी ठरवून दिलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

**१.**ज्या वकीलांना जिल्हा परिषद यवतमाळ तर्फे नियुक्ती दिली असेल त्यांना नियुक्ती दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन यवतमाळ जिल्हा परिषदेच्या विरुध्द असलेले कोणतेही न्यायालयीन प्रकरण / दावा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्विकारता येणार नाही.

**२.**जिल्हा परिषदेचे न्यायालयीन प्रकरणे साधारणत: क्रमवारीने देण्यात येतील, परंतु न्यायालयीन प्रकरणामध्ये वकील नियुक्तीबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जि.प.यवतमाळ यांचा निर्णय अंतिम राहील.

**३.**यवतमाळ जिल्हा परिषदेचे नियुक्त वकील म्हणुन खालीलप्रमाणे मानधनासाठी ते पात्र राहतील. इतर कोणताही जादा खर्च मंजुर केल्या जाणार नाही.

**४. अ)** यवतमाळ येथील किंवा इतरत्र न्यायालयातील व इतर न्यायपिठातील मुळ दाव्याकरीता प्रति दावा रुपये ६,०००/- वकील फी व स्टेशनरी खर्च रु.१०००/- अशी एकत्रित जास्तीत जास्त रक्कम रुपये ७,०००/- मंजुर केल्या जाईल.

**४. आ)** मा.उच्च न्यायालयीन तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणांतील दाव्यांच्या प्रकरणी प्रति दावा रुपये १२,०००/- वकील फी व स्टेशनरी खर्च रु.३०००/- अशी एकत्रित जास्तीत जास्त रक्कम रुपये १५,०००/- मंजुर केल्या जाईल.

**४. इ)** मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील दाखल प्रकरणाकरीता प्रति दावा रुपये ४०,०००/- वकील फी व स्टेशनरी खर्च रु.१०,०००/- अशी एकत्रित जास्तीत जास्त रक्कम रुपये ५०,०००/- मंजुर केल्या जाईल.

**४. ई)** कोणत्याही प्रकरणी नियमानुसार कायदेशिर लेखी सल्ला देण्याचे शुल्क एकावेळी एका प्रकरणांत जास्तीत जास्त रुपये १०००/- दिल्या जाईल.

**४. उ)** वकील नोटीसचे उत्तर देण्यास वकील फी व त्या अनुषंगीक किरकोळ खर्च एकुण रुपये १०००/- जास्तीत जास्त दिल्या जाईल.

**४. ऊ)** उच्च न्यायालयीन व इतर न्यायालयीन तसेच इतर न्यायपिठातील प्रकरणांत ब्रीफ ड्राफ्टकरीता जास्तीत जास्त रुपये १५००/- पर्यंत खर्च मंजुर केल्या जाईल.

**४. ए)** न्यायपिठातील प्रकरणांत caveat दाखल करणेकरीता सदर प्रकरणाला एक न्यायालयीन प्रकरण समजण्यात येईल.

**५.**वकील फी व सादील / किरकोळ खर्चाची रक्कम संबंधीत दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयानंतर संबंधीत खातेप्रमुख यांचेकडून अदा केले जाईल.

**६.**प्रत्येक न्यायालयीन खर्चाबाबत त्याची पावती / प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील, अशी पावती पडताळणी करतांना त्यास मंजुरी देणे किंवा नाकारणे किंवा दुरुस्त करुन मंजुरी देणे याबाबतचे अधिकार संबंधीत खाते प्रमुखांना राहतील. याबाबत वाद उत्पन्न झाल्यास अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यवतमाळ यांना राहील.

**७.**न्यायप्रविष्ट प्रकरणी अतिरिक्त वकीलांची नियुक्ती करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुसऱ्या वकीलास चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना राहतील.

**८.**रुपये १००/- चे बंधपत्रावर विहीत अटी व शर्तीचा करारनामा संगणीकृत / टंकलिखीत करुन दिल्यानंतर बंधपत्राची कार्यवाही दहा दिवसांत पुर्ण करावी.

**९.**सोपविलेल्या न्यायप्रविष्ट दाव्यांचा अहवाल दरमहा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद,यवतमाळ यांना पाठवावा कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पूर्वसुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनलमधुन नांव कमी करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना राहतील.

१०.जिल्हा परिषदेचे पॅनलवरील वकीलांनी यवतमाळ जिल्हा परिषदेचे वतीने न्यायालयात तात्काळ उत्तरे दाखल करण्याची दक्षता घ्यावी. त्यांना संबंधीत विभागांकडून दस्तऐवज / माहिती वेळीच प्राप्त न झाल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, यवतमाळ यांना लेखी स्वरुपात / दुरध्वनी व्दारे तात्काळ कळविण्यात यावे.

११.अर्ज विहीत नमुन्यात करावा.

१२.करारनाम्याचा कालावधी नेमणुक दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन तिन वषापर्यंत बंधनकारक राहील. मुदतवाढ देण्याबाबत समिती निर्णय घेईल.

(पंकज भोयर)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद यवतमाळ

( मंदार पत्की,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

# जाहीरात

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## (सामान्य प्रशासन विभाग)

**जिल्हा परिषद यवतमाळ मधील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्या करीता कंत्राटी विधी सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत**

**पदसंख्या :- १ (एक)**

१. पात्रता अ) एल.एल.बी. किंवा त्यापेक्षा जास्त, ब) बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र अॅड गोवा किंवा बार कौन्सील ऑफ इंडिया येथील नोंदणी.
२. अनुभव - न्यायालयात वकील व्यवसाय केल्याचा ५ ते१० वर्षाचा अनुभव.
३. अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे - शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र, बार असोसिएशचा परवाना तसेच अनुभव प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्राच्या स्व सांक्षकिंत प्रती.
४. यापुर्वी जिल्हा परिषदच्या वकील पॅनलवर असल्यास त्यांच्या कामाचे मुंल्यमापन करुन समिती निर्णय घेईल
५. अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक ३ जुलै, २०२४ (मुलाखतीच्या वेळेस मुळ प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे)
६. मुलाखतीचा दिनांक २३ जुलै,२०२४.
७. कंत्राटी विधी सल्लागार नियुक्ती मुलाखत घेवुन करण्यात येईल.
८. अर्ज सादर करावयाचे ठिकाण - उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद प्रशासकीय ईमारत पहिला माळा, आर्णी रोड, जिल्हा परिषद यवतमाळ ४४५००१
कंत्राटी विधी सल्लागार नियुक्ती अर्जाचा नमुना, अटी व शर्ती www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

क्र.यजिप/साप्रवि/आस्था-२/कावि-९५३५/२०२४
जिल्हा परिषद, यवतमाळ,
(सामान्य प्रशासन विभाग)
दिनांक २५/६/२०२४.

**(मंदार पत्की, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

# जिल्हा परिषद, यवतमाळ
## सामान्य प्रशासन, विभाग
### कंत्राटी विधी सल्लागार या पदावर नियुक्ती बाबतच्या अटी शर्ती

1. सदर नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असुन 11 महिण्या करिता आहे, कोणतीही पूर्व सुचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
2. प्रथम तीन महिण्यातील काम असमाधानकारक वाटल्यास नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
3. सदर पदाची नेमणूक पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. विधी सल्लागार हे शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही किंवा त्याबाबत कोणताही दावा करणार नाही.
4. पूर्व चारित्र्य व वर्तणूक याबाबत पोलिस विभागाचा अहवाल आक्षेपार्ह्य असल्यास, कोणतीही पूर्वसुचना न देता, विधी सल्लागार पदाची सेवा समाप्त करण्यात येईल.
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,यवतमाळ यांचे पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.
6. न्यायालयीन प्रकरणी दौऱ्यावर जायचे असल्यास, वरिष्ठांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.
7. न्यायालयीन प्रकरणाचा निपटारा तातडीने करावा लागेल. तसेच न्यायालयीन प्रकरणे निकाली काढून केलेल्या कार्यवाहीबाबत नोंदवहीमध्ये (साप्ताहिक प्राप्त/निकाली/ शिल्लक) नोंद ठेवावी लागेल.
8. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.
9. कार्यालयात, कार्यालयीन वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक राहिल.
10. आवक/जावक शाखा,जि.प.यवतमाळ मार्फत विधी शाखेस प्राप्त होणारी सर्व न्यायालयीन प्रकरणांची नोंदवहीमध्ये नोंद करून स्विकारणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे संबंधीत विभागाकडुन/ शाखेकडुन माहिती प्राप्त करुन, न्यायालयीन प्रकरणे निकाली काढावी लागेल.
11. रूजू होण्यापूर्वी रू. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहिल.
12. नेमणूकीच्या ठिकाणी रूजू होण्याकरिता प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
13. नेमणूक आदेश मिळाल्यापासून 7 दिवसाच्या आंत रूजू व्हावे, विहित कालावधीत रूजू न झाल्यास उक्त पदावर नेमणूक मिळण्याचा हक्क संपुष्टात येईल.
14. विधी सल्लागार या पदावरील नियुक्ती 11 महिण्याच्या कालावधीकरिता असुन, जास्तीत जास्त पुढील 3 वर्षापर्यंत मुदतवाढ देता येईल.
15. विधी सल्लागार या पदावरील सेवेकरिता मुदतवाढ देणे किंवा सेवा संपुष्टात आणण्याचे, तसेच आदेशात बदल करण्याचे सर्वाधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.
16. ठोक मानधन रू.30,000/- व दुरध्वनी व प्रवास खर्च रूपये 5,000/- असे एकुण रु.35000/- ठोक मानधन प्रति माह देय राहील.
17. नियुक्त विधी सल्लागार यांना खाजगी प्रॅक्टीस करता येणार नाही.

**(पंकज भोयर)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**(मंदार पत्की, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

विषय :- यवतमाळ जिल्हा परिषदच्या न्यायालयीन प्रकरणाकरीता वकील पॅनल तथा कंत्राटी विधी सल्लागार नियुक्ती बाबत.

**( कंत्राटी विधी सल्लागार / जि. प. वकील पॅनल ) योग्य त्या ठिकाणी अशी खुन करावी. व पासपोर्ट साईजचा फोटो अर्जा सोबत जोडण्यात यावा.**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे माझी वैयक्तीक माहिती सादर करण्यात येत आहे. त्यानुसार माझे अर्जाचा विचार करण्यात यावा ही विनंती.

आडनांव नांव वडीलाचे नांव

१) अर्जदाराचे पुर्ण नांव (आडनांव प्रथम) (मराठी व इंग्रजी) :-

२) संपुर्ण पत्ता (दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्र. इत्यादींसह व ई-मेल I.D. ) :-

३) अर्जदाराची जन्मतारीख तसेच :-
दि.३१.५.२०२४ रोजी असणारे वय :-
(वर्ष महीने आणि दिवस) वर्ष ------ महीने ------ दिवस ------

४) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :-

५) अर्जदाराने विधी पदवी प्राप्त केलेल्या मान्यताप्राप्त विद्यापिठाचे / संस्थेचे नांव :-

६) विधी पदवी प्राप्त केल्याची तारीख :-

७) ॲडव्होकेट म्हणुन ज्या मान्यता प्राप्त संस्थेचा नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला आहे त्या संस्थेचे नांव (बार कौन्सिल) नोंदणी क्रमांक आणि दिनांक :-

८) प्राप्त झालेला नोंद्रणी क्रमांक अजूनही कार्यान्वीत आहे काय ? :-

९) उच्च न्यायालयात / जिल्हा न्यायालयात ॲडव्होकेट म्हणुन अर्जाचे दिवशी झालेली प्रॅक्टीस :-

१०) कुठल्या तालुक्यातील न्यायालयासाठी अर्ज केला तो तालुका / मुख्यालय / उच्च न्यायालय खंडपीठ / सर्वोच्च न्यायालय :-

११) इतर तपशिल :-

सदहू नियुक्तीसाठी लागू असलेल्या आपल्या सर्व अटी व शर्तीची मला जाणीव असून या मला मान्य आहेत. (त्या सोबत स्विकृतीसह जोडलेल्या आहेत.)

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी व पुर्ण नांव

दिनांक :- (ॲड.---------------------------)